राज्य सेवा (मुख्य) परीक्षा - २०२४ परीक्षा दिनांक २७ मे, २०२५.

# 2024

J19

संच क्र. **A**

| प्रश्नपुस्तिका क्रमांक BOOKLET NO. |
|---|
| 208477 |

# Paper – II
# Marathi and English (Objective)

एकूण प्रश्न : 100

वेळ : 1 (एक) तास

एकूण गुण : 100

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

परीक्षा-क्रमांक

केंद्राची संकेताक्षरे

शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तर-क्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्न-क्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नांकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तराकरीता 25% किंवा 1/4 एवढे गुण एकूण गुणांमधून वजा/कमी करण्यात येतील."**

**पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये**

### ताकीद

**ह्या प्रश्नपुस्तिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षा कक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. स्पर्धा परीक्षा घेण्यासाठी, प्राधिकृत केलेली, नेमलेली किंवा कर्तव्ये सोपविलेली कोणतीही व्यक्ती, प्रश्नपुस्तिका उघडण्यासाठी व वितरित करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेपूर्वी अशी प्रश्नपुस्तिका किंवा तिचा कोणताही भाग किंवा तिची प्रत उघडणार नाही, फोडणार नाही किंवा ताब्यात घेणार नाही किंवा पाहणार नाही किंवा सोडविणार नाही किंवा सोडविण्यास सहाय्य करणार नाही; असे केल्यास "महाराष्ट्र स्पर्धा परीक्षा (अनुचित मार्गांस प्रतिबंध) अधिनियम-2024" मधील तरतुदीनुसार सदर व्यक्ती तीन वर्षापेक्षा कमी नसेल परंतु, जी पाच वर्षापर्यंत वाढविता येईल इतक्या मुदतीची कारावासाची शिक्षा आणि दहा लाख रुपयांपर्यंतच्या द्रव्यदंडास पात्र होईल. तसेच ह्या प्रश्नपुस्तिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा.**

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

1. सामासिक शब्द व समास यांच्या योग्य जोड्या ओळखा.

| शब्द | | समास |
|---|---|---|
| a. ईश्वरनिर्मित | – | i. तृतीया तत्पुरुष |
| b. रोगमुक्त | – | ii. सप्तमी तत्पुरुष |
| c. वाघनख | – | iii. षष्ठी तत्पुरुष |
| d. पाणबुड्या | – | iv. पंचमी तत्पुरुष |

(1) केवळ a व c बरोबर, b व d चूक

(2) केवळ a व d बरोबर, b व c चूक

(3) केवळ a व b बरोबर, c व d चूक

(4) केवळ b व d बरोबर, a व c चूक

---

2. प्रचलित लेखन नियमानुसार अचूक शब्दगट कोणता ?

a. हरीकृपा, वधुपरीक्षा, कवीराज, गतीमान

b. वायुपुत्र, पशुपक्षी, भानुविलास, लघुकथा

c. महीपाल, वाणीवैभव, नदीतीर, भगिनीमंडळ

d. शत्रूपक्ष, रविवार, भक्तीपर, पशूपक्षी

(1) फक्त a आणि b बरोबर

(2) फक्त b आणि c बरोबर

(3) फक्त c आणि d बरोबर

(4) फक्त a आणि d बरोबर

---

3. "अरे राजू बरं झालं तू आलास तुझ्याकडे थोडसं काम होतं बरं आईची तब्येत आता कशी आहे" योग्य विराम चिन्हांचा वापर करा.

(1) अरे राजू बरं झालं ? तू आलास, तुझ्याकडे थोडसं काम होतं ! बरं आईची तब्येत आता कशी आहे.

(2) "अरे, राजू ! बरं झालं तू आलास. तुझ्याकडे थोडसं काम होतं. बरं, आईची तब्येत आता कशी आहे ?"

(3) "अरे राजू बरं झालं तू आलास ? तुझ्याकडे थोडसं काम होतं. बरं आईची तब्येत आता कशी आहे."

(4) 'अरे राजू बरं झालं' तू आलास ? तुझ्याकडे थोडसं काम होतं, बरं ! आईची तब्येत आता कशी आहे.

---

4. शुद्धलेखन नियमानुसार शुद्ध शब्दांचा पर्याय ओळखा.

(1) अध्यात्मिक, अनुसया, आशिर्वाद

(2) आध्यात्मिक, अनसूया, आशीर्वाद

(3) आध्यात्मिक, अनसूया, आशिर्वाद

(4) अध्यात्मिक, अनुसया, आशीर्वाद

---

5. वसुधा आपली एकटीच पुढे निघून आली. या वाक्याबाबत पुढील विधाने वाचून योग्य पर्याय निवडा.

a. 'आपली' हा शब्द व्यर्थ केवलप्रयोगी शब्द आहे.

b. 'एकटीच' हा शब्द व्यर्थ केवलप्रयोगी शब्द आहे.

c. 'पुढे' हा शब्द व्यर्थ केवलप्रयोगी शब्द आहे.

(1) b बरोबर, a व c चूक

(2) c बरोबर, a व b चूक

(3) a, b व c चूक

(4) a बरोबर, b व c चूक

---

6. खाली दिलेले वाक्प्रचार व त्यांच्या अर्थाच्या योग्य जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| a. चंदन करणे | i. नाश होणे |
| b. चांदी उडणे | ii. नाशासाठी तयार होणे |
| c. तिलांजली द्यावयास उठणे | iii. नाश करणे |
| d. दमन करणे | iv. नष्ट करणे |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | ii | iv | i | iii |
| (2) | iii | i | ii | iv |
| (3) | iv | iii | ii | i |
| (4) | iii | ii | i | iv |

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

7. वत्सलाबाई म्हणाल्या की, 'आज माझा आषाढी एकादशीचा उपवास आहे. मी आज थंडा फराळ करणार'.

अधोरेखित वाक्प्रचाराचा अर्थ काय आहे ?

(1) थंड पदार्थ खाणे

(2) फक्त थंड दूध घेणे

(3) उपवासाचे पदार्थ खाणे

(4) उपाशी राहणे

---

8. 'तरडी पेटणे' या वाक्प्रचाराचा अर्थ ओळखा.

(1) हद्दपार करणे (2) दुरून पाहणे

(3) रागावणे (4) जळून जाणे

---

9. वाक्प्रचार व त्यांच्या अर्थाच्या योग्य जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| a. | खनपटीस बसणे | i. | रडायला येणे |
| b. | कंठ दाटून येणे | ii. | जबाबदारी दुसऱ्यावर सोपविणे |
| c. | ओटीत घालणे | iii. | गहिवरुन येणे |
| d. | गाई पाण्यावर येणे | iv. | एखाद्याचा पाठपुरावा करणे |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | i | ii | iii | iv |
| (2) | iii | iv | ii | i |
| (3) | iv | iii | ii | i |
| (4) | ii | i | iv | iii |

---

10. सर्व ठिकाणी एकाच प्रकारचा अनुभव या अर्थाची म्हण – योग्य पर्याय निवडा.

a. घरोघरी मातीच्या चुली

b. एका माळेचे मणी

c. कुठेही जा पळसाला पाने तीन

(1) a व b बरोबर, c चूक (2) a, b व c बरोबर

(3) a व c बरोबर, b चूक (4) b व c बरोबर, a चूक

11. खालील समानार्थी शब्दांचे गट ओळखा.

a. चंद्र – इंदू, हिमांशू, भानू

b. नदी – सरिता, तटिनी, तारांगिणी

c. लक्ष्मी – श्री, इंदिरा, कमला

d. ज्ञानी – शहाणा, डोळस, जाणकार

(1) फक्त a व c बरोबर, b व d चूक
(2) फक्त b व c बरोबर, a व d चूक
(3) फक्त c व d बरोबर, a व b चूक
(4) फक्त a बरोबर, b, c व d चूक

---

12. 'भाटक' या शब्दाचा समानार्थी शब्द ओळखा.

(1) मजुरी
(2) जमीन
(3) दलाली
(4) वतन

---

13. 'गडद निळे-गडद निळे <u>जलद</u> भरुनी आले.'

वरील काव्यपंक्तीतील अधोरेखित शब्दाचा समास कोणता येईल ?

(1) अनुप्रास
(2) अलुक् तत्पुरुष
(3) उपपद तत्पुरुष
(4) विशेषण पूर्वपद

---

14. 'अभ्युदय' या शब्दाच्या विरुद्धार्थी शब्द ओळखा.

(1) अभ्युत्थान
(2) अपकर्ष
(3) उत्थान
(4) असाध्य

---

15. खालील प्रत्ययसाधित शब्दांबाबतची अचूक विधाने ओळखा.

a. पांडव – 'अ' हा संस्कृत प्रत्यय 'पंडु' या नामाला जोडला आहे.

b. बागवान – 'वान' हा अरबी प्रत्यय 'बाग' या नामाला जोडला आहे.

c. गोडसर – 'सर' हा मराठी प्रत्यय 'गोड' या विशेषणाला जोडला आहे.

d. उनाडकी – 'की' हा हिंदी प्रत्यय 'उनाड' या विशेषणाला जोडला आहे.

(1) फक्त a व c बरोबर b व d चूक
(2) फक्त a बरोबर b, c व d चूक
(3) फक्त a, c व d बरोबर b चूक
(4) फक्त b व c बरोबर a व d चूक

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

16. 'अंशाभ्यस्त-पूर्णाभ्यस्त - अनुकरणवाचक' या क्रमाने येणारा योग्य पर्याय कोणाता ?

(1) झाडबीड - लाललाल - किरकीर

(2) कडकडाट - घेईघेई - दगडबिगड

(3) समोरासमोर - घरबीर - फडफड

(4) शेजारीपाजारी - वटवट - हालहाल

---

17. पुढील विधाने वाचून योग्य पर्याय निवडा.

a. मिश्रवाक्यात एकच वाक्य प्रधान असते, बाकीची सर्व गौण असतात.

b. संयुक्तवाक्यात दोन किंवा अधिक प्रधानवाक्ये असतात.

c. संयुक्तवाक्याचे दोन प्रकार-केवल संयुक्त व मिश्रसंयुक्त.

(1) b व c बरोबर, a चूक

(2) a व b बरोबर, c चूक

(3) a व c बरोबर, b चूक

(4) a, b व c बरोबर

---

18. म्हणी व म्हणींचे अर्थ यांच्या जोड्या जुळवा.

a. छक्के पंजे करणे — i. न घाबरता बसणे

b. छाती दाखवत बसणे — ii. भयंकर घाबरणे

c. छातीला हात लाऊन सांगणे — iii. हातचलाखी करणे

d. छाती फाटणे — iv. खात्रीपूर्वक सांगणे

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | iv | iii | i | ii |
| (2) | iii | i | iv | ii |
| (3) | ii | iv | iii | i |
| (4) | i | ii | iv | iii |

---

19. खालील विधानाचे एक केवलवाक्य करा.

माझ्या आजीने मला एक डबा पाठविला त्यात खाण्याचे गोड पदार्थ होते.

(1) माझ्या आजीने मला एक डबा पाठविला आणि त्यात खाण्याचे गोड पदार्थ होते.

(2) माझ्या आजीने मला एक डबा पाठविला व त्यात खाण्याचे गोड पदार्थ होते.

(3) माझ्या आजीने मला एक डबा पाठविला शिवाय त्यात खाण्याचे गोड पदार्थ होते.

(4) माझ्या आजीने मला गोड खाऊचा एक डबा पाठविला.

**20.** विधेय विभागात कोणते घटक असतात ?

a. कर्म व कर्मविस्तार

b. विधानपूरक व विधेयविस्तार

c. क्रियापद

(1) a बरोबर, b व c चूक (2) b बरोबर, a व c चूक

(3) a, b व c बरोबर (4) a चूक, b व c बरोबर

**21.** खालील शब्दगट व शब्दांचे प्रकार यांच्या जोड्या जुळवा.

a. पापड, दाम, माळा i. तद्भव शब्द

b. गाव, पान, घास ii. तत्सम शब्द

c. डोंगर, दगड, गुडघा iii. देशी शब्द

d. माता, कवि, उत्सव iv. परभाषीय शब्द

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | ii | iv | i | iii |
| (2) | ii | iii | iv | i |
| (3) | iv | i | iii | ii |
| (4) | i | iii | ii | iv |

**22.** देशी शब्दांचा योग्य पर्याय निवडा.

(1) डोके, पोट, ताळा, डोळे

(2) बोका, दगड, धोंडा, रेडा

(3) गुडघा, डबा, हाड, बाजरी

(4) झोप, खुळा, मठ्ठा, तपास

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

23. तत्पुरुष समासा संबंधी पुढील विधाने वाचा

a. देवपूजा (देवाची पूजा) या प्रकारास समानधिकरण तत्पुरुष समास असे म्हणतात.

b. काळमांजर (काळे मांजर) यास व्यधिकरण तत्पुरुष असे म्हणतात.

दिलेल्या पर्यायातून योग्य विधानाचा पर्याय निवडा.

(1) a आणि b दोन्ही योग्य आहेत (2) a आणि b दोन्ही अयोग्य आहेत

(3) a योग्य आणि b अयोग्य (4) a अयोग्य आणि b योग्य

---

24. कर्मधारय समासातील पहिले पद हे संख्याविशेषण असते व संपूर्ण सामासिक शब्दाने समूहाचा बोध होतो तेव्हा त्यास काय म्हणतात ?

a. कर्मधारय

b. मध्यमपदलोपी

c. उपपद तत्पुरुष

d. द्विगू

(1) केवळ b बरोबर a, c, d चूक

(2) केवळ d बरोबर a, b, c चूक

(3) केवळ a बरोबर b, c, d चूक

(4) केवळ c बरोबर a, b, d चूक

---

25. 'अकरणरूपी' वाक्य कोणत्या वाक्यास म्हटले जाते ?

(1) विधानार्थी वाक्य (2) होकारार्थी वाक्य

(3) नकारार्थी वाक्य (4) स्वार्थी वाक्य

---

26. 'फुकटचं मिळालं त्याची धूळधाण करणे' या अर्थाची म्हण पुढील पर्यायातून अचूक ओळखा.

(1) फुकटची कढी अन् धावू धावू वाढी

(2) फुकटचा गाल आणि केला लाल

(3) फुकटच्या म्हशीमागं विकतचं रेडकू

(4) फुकटचं घावलं बापल्याक धावलं

---

27. 'जमिनीचे फूल चालवी जगाची चूल' या म्हणीचे योग्य अर्थ ओळखा.

a. जमिनीच्या फुलातून जगाचे पोट भरते.

b. जमिनीवर पिकाचे फूल फुलते त्यावर जगाची चूल पेटते.

c. जमिनीच्या वरच्या थरातच पिके येतात.

d. धूल, फूल, चूल, मूल हे सृष्टिचे चक्र आहे.

(1) a, b, d बरोबर, c चूक

(2) a, b, c बरोबर, d चूक

(3) फक्त b बरोबर a, c, d चूक

(4) फक्त c बरोबर a, b, d चूक

---

28. 'हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत' या शब्दसमुहाचा एक शब्द कोणता ?

(1) आसेतुहिमाचल

(2) कन्यातुहिमाचल

(3) काश्मीरतुहिमाचल

(4) कन्यातुहिमालय

---

29. 'मी तुझ्याशी एक व्हावे अन् भ्रमावे योजने,

जीवनाचा श्वास व्हावे अन् युगांची गुंजने'

वरील काव्यपंक्तीतील अलंकार ओळखा.

(1) श्लेष
(2) यमक
(3) अनुप्रास
(4) उपमा

---

30. दोन अथवा अधिक समान वाक्ये प्रधानत्वबोधक उभयान्वयी अव्ययांनी जोडली असतात तेव्हा ते कोणते वाक्य होते ?

(1) मिश्र
(2) संयुक्त
(3) नामगौण
(4) विशेषणगौण

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**31.** योग्य जोड्या जुळवा.

| | | |
|---|---|---|
| a. | तालव्य | i. त्, थ्, द्, ध् |
| b. | ओष्ठ्य | ii. च्, छ्, ज्, झ् |
| c. | मूर्धन्य | iii. प्, फ्, ब्, भ् |
| d. | दंत्य | iv. ट्, ठ्, ड्, ढ् |

| | **a** | **b** | **c** | **d** |
|---|---|---|---|---|
| (1) | i | iv | ii | iii |
| (2) | ii | iv | i | iii |
| (3) | iii | ii | iv | i |
| (4) | ii | iii | iv | i |

**32.** देवनागरी लिपीतील उच्चार दोन पण चिन्ह मात्र एकच असणारे पर्याय कोणते ?

(1) ष, श, ऋ (2) च, ज, झ (3) न, ण, म (4) ज, श, न

**33.** शुद्धलेखन नियमानुसार कोणता पर्याय बरोबर आहे ?

(1) पूर्व, दीप, पिडा (2) पीडा, नविन, संगीत

(3) नीती, भीती, प्रीती (4) क्रिडा, शरीर, परीक्षा

**34.** 'दुआब' या शब्दासाठी योग्य शब्दसमूह कोणता ?

(1) दोनदा जन्मलेला (2) दोन नद्यांमधील जागा

(3) तीन रस्ते एकवटतात ती जागा (4) पुरग्रस्त भाग

**35.** पुढील विधाने वाचून योग्य पर्याय निवडा.

a. व्यक्तीचा, वस्तूचा किंवा प्राण्याचा गुणधर्म किंवा स्वभाव दाखविणाऱ्या नामाला भाववाचक नाम म्हणतात.

b. भाववाचक नामासच धर्मवाचक नाम म्हणतात.

c. भय, हुशारी, चातुर्य हे शब्द भाववाचक नामे आहेत.

(1) a व b बरोबर, c चूक

(2) a व c बरोबर, b चूक

(3) a, b व c बरोबर

(4) b व c बरोबर, a चूक

खालील उतारा वाचून त्याखालील **36** ते **40** या प्रश्नांची उत्तरे सोडवा.

गेल्या काही वर्षांत इंग्रजीचे महत्त्व फुगवून सांगण्यासाठी हा एक नवीन मुद्दा सांगण्यात येतो की, संगणक क्षेत्रामध्ये भारताने जे जागतिक पातळीवर स्थान मिळवलेले आहे, ते इंग्रजी भाषेवरील प्रभुत्वामुळेच शक्य झालेले आहे. आणि जर आम्ही इंग्रजीचे महत्त्व कमी केले तर आम्हांला या क्षेत्रामध्ये जे महत्त्व मिळालेले आहे ते कमी कमी होत जाणार आहे. भारताच्या एकूण व्यापारामध्ये Software Exports याचे स्थान गौण आहे असे म्हणणे बरोबर होणार नाही. एकूण आपली जी निर्यात आहे ती २.५ लाख कोटीच्या आसपास आहे. तर त्याच्यापैकी ह्या व्यवसायाची निर्यात १०% म्हणजे साधारण २५,००० कोटींच्या आसपास आहे. आणि इंग्रजीचे देशातले आमच्या शिक्षणात महत्त्व आम्ही कमी केले, म्हणून आमचे हे क्षेत्र जाणार आहे असे समजण्याचे मुळीच कारण नाही. कारण चीननेसुद्धा त्यांचे सारे शिक्षण चिनीभाषेत होत असले तरीसुद्धा ह्या क्षेत्रामध्ये भारताइतकाच वाटा मिळवून दाखवला आहे. म्हणजे असे समजण्याचे कारण नाही की, आम्ही इंग्रजी भाषेमधून उच्च शिक्षण हे जे सध्या चालू आहे ते बंद करून देशी भाषेमध्ये शिक्षण चालू केले तर आमचा हा व्यवसाय बंद पडणार आहे. हा व्यवसाय तसाच चालू राहू शकेल. दुसरा एक मुद्दा असा आहे की, अमेरिका, इंग्लंड हे प्रमुख देश असे आहेत की जे आमच्याकडून आमच्या या मालाची Software ची आयात करीत आहेत, ती सतत अशीच चालू राहील असे समजणे हे धोक्याचे ठरण्याची शक्यता आहे. त्याची कारणे अनेक आहेत. एक म्हणजे त्यांच्या देशामध्येसुद्धा हा व्यवसाय वाढत आहे आणि अमेरिकेत बऱ्यापैकी वादळ उठलेलं आहे की, आमच्या देशातील लोकांचे काम हे भारतीय लोक हिरावून घेत आहेत. म्हणून त्यांनी ह्या क्षेत्रामध्ये जास्त शिक्षण वाढवायला सुरुवात केली आहे आणि जसजसा अधिक काळ जाईल, तसतसा त्यांनासुद्धा त्या कार्यातला जास्त वाटा मिळू शकेल. म्हणजे थोडक्यात असं म्हटलं तरी चालेल की, लग्नसमारंभ घरात असला की, त्या वेळेला आपल्याला वाढपी, आचारी, भटजी या सर्व लोकांना बोलवावं लागतं. त्यांना भरपूर पैसे द्यायला लागतात. पण लग्नसमारंभ हा सतत चालू असणारा कार्यक्रम नाही, त्याप्रमाणे हे जे काम आत्ता तेथे चालू आहे, ते त्याच वेगाने पुढे चालू राहणार आहे असे आपण समजणे, त्यावर आमचे स्वदेशाचे धोरण आखणे हा एक वेडगळपणा आहे. जसजसा काळ जाईल, तसतसे ते या बाबतीत स्वयंपूर्ण होण्याचा निश्चितच प्रयत्न करणार आहेत आणि जर आपण पूर्वीचा इतिहास बघितला तर हे जे युरोपियन देश आहेत किंवा अमेरिका आणि कॅनडा यांनी भारतीय लोकांना किंवा इतर लोकांना ज्या पद्धतीची वागणूक दिलेली आहे, त्यावरून आपण हे शिकावयास हवे की, 'गरज सरो आणि वैद्य मरो,' अशाच प्रकारची वृत्ती या लोकांची आहे. तेव्हा त्यांना आज गरज आहे, म्हणून ते बोलवतात. परंतु म्हणून ती कायमचीच आमची अशी संधी चालू राहणार आहे, असे समजून आम्ही आमचे धोरण आखणे हे निश्चितच चुकीचे ठरणार आहे. आम्हांला आमच्या देशाचा कसा विकास करावयाचा आहे, हा प्रश्न आम्ही प्रामुख्याने पुढे ठेवला पाहिजे. जगात असे अनेक देश आहेत,

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

फ्रान्स आहे, जर्मनी आहे, जपान आहे की, जे वैभवाच्या शिखरावर आहेत. परंतु ते काहीही Software Export करत नाहीत. कारण ते स्वयंपूर्ण झालेले आहेत. त्यांनी स्वत: चे इतर मालाचं उत्पादन असे केलेले आहे की, ज्यामुळे त्यांना जागतिक बाजारपेठेमध्ये त्यांचा माल खपवता येतो. त्यांना आपल्याप्रमाणे माणसे दुसरीकडे पाठविणे- Software Export साठी- याची काही गरज उरली नाही. त्यांना दुसऱ्या परकीय भाषा शिकण्याची मुळीच गरज उरलेली नाही.

दुसरा एक महत्त्वाचा मुद्दा लक्षात घेण्याजोगा आहे. तो म्हणजे असा आहे की, आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये Software Export हा अगदी छोटासा भाग आहे. जगाचा एकूण आंतरराष्ट्रीय व्यापार जो आहे तो जवळजवळ दोन हजार दोनशे बिलियन डॉलरचा आंतरराष्ट्रीय व्यापार जगामध्ये चालू असतो आणि त्याच्यापैकी Software याचा वाटा फारतर शंभर बिलियन डॉलर. अशा परिस्थितीमध्ये ह्याच एका गोष्टी वर आम्ही अवलंबून राहणे, लक्ष केंद्रित करणे हा वेडेपणा होय. सगळ्यता ठळक जे मोठे आंतरराष्ट्रीय व्यापारामधले पदार्थ आहेत ते म्हणजे मोटारी आणि यंत्रसामग्री ह्या दोन्होंची मिळून जर बेरीज घेतली तर जवळजवळ आंतरराष्ट्रीय व्यापाऱ्याच्या ८०% पर्यंत व्यापार ह्या वस्तूंचा चालतो. तेव्हा निर्यात व्यापारामध्ये भारताला जर यथायोग्य स्थान मिळवायचे असेल तर आम्ही ह्याच्यापैकी कुठल्यातरी वस्तू निर्यातीसाठी निवडल्या पाहिजेत. जसं मोटारी आणि मोटारींचे पार्ट्स बनविणे हा जो धंदा आहे ह्याच्यामध्ये खूप मोठ्या प्रमाणामध्ये विकासास वाव आहे आणि ह्याच्यामध्ये आमच्या देशातील लोक मोठ्या संख्येने सामील होऊ शकतात. Software Export मध्ये संपूर्ण भारतामधून फार तर चार-पाच लाख लोक सहभाग घेऊ शकतात.

---

**36.** भारताला आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये अधिक निर्यात करायची असेल तर कोणत्या क्षेत्रात संधी आहे ? योग्य पर्याय निवडा.

a. यंत्र सामग्री उत्पादन

b. मोटारी उत्पादन

c. सॉफ्टवेअर उत्पादन

d. शस्त्रास्त्र उत्पादन

(1) फक्त a, b व c बरोबर

(2) फक्त a व b बरोबर

(3) फक्त b व c बरोबर

(4) फक्त c व d बरोबर

**37.** भारतीयांनी प्रामुख्याने कोणता प्रश्न डोळ्यासमोर ठेवला पाहीजे ?

(1) सॉफ्टवेअर विकास करणे

(2) देशाचा विकास करणे

(3) इंग्रजी भाषेचा विकास करणे

(4) बाजारपेठेचा विकास करणे

---

**38.** अमेरिकन लोकांचा भारतीय लोकांबाबत कोणता समज निर्माण झाला आहे ? योग्य पर्याय निवडा.

a. भारतीय लोक अमेरिकेत आपली संस्कृती रुजवत आहेत.

b. अमेरिकन लोकांचे काम भारतीय लोक हिरावून घेत आहेत.

c. अमेरिकेचा व्यापार भारतीय लोक हिरावून घेत आहेत.

d. अमेरिकेच्या शिक्षणावर भारतीय लोक कब्जा करत आहेत.

(1) a व b बरोबर, c व d चूक

(2) c व d बरोबर, a व b चूक

(3) फक्त a बरोबर, b, c व d चूक

(4) फक्त b बरोबर, a, c व d चूक

---

**39.** देशाचा विकास करण्यासाठी कोणते धोरण राबविणे गरजेचे आहे ?

(1) परदेशात नोकरी

(2) कामगारांची निर्मिती

(3) स्वयंपूर्ण बनणे

(4) परकीय भाषा शिकणे

---

**40.** आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये Software Export चा व्यापार किती डॉलर आहे ?

(1) दोन हजार दोनशे बिलियन डॉलर

(2) शंभर बिलियन डॉलर

(3) एक हजार बिलियन डॉलर

(4) एकशे पन्नास बिलियन डॉलर

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**41.** 'देह जावो अथवा राहो । पांडुरंगी दृढ भावो ।।' या चरणातील अधोरेखित शब्द कोणते अव्यय आहे ?

(1) समुच्चयबोधक उभयान्वयी अव्यय

(2) न्यूनत्वबोधक उभयान्वयी अव्यय

(3) परिणामबोधक उभयान्वयी अव्यय

(4) विकल्पबोधक उभयान्वयी अव्यय

---

**42.** पुढे दिलेल्या वाक्यातील प्रयोगाचा प्रकार ओळखा.

"चारा शेळीकडून खाल्ला जातो".

(1) कर्मकर्तरी

(2) भावकर्तरी

(3) सकर्मक कर्तरी

(4) अकर्मक भावे

---

**43.** आधीच्या स्वराचा लोप होऊन पुढे आलेला स्वर कायम राहतो तेव्हा त्याला काय म्हणतात ?

(1) पूर्वरूप संधी

(2) पररूप संधी

(3) व्यंजन संधी

(4) विसर्ग संधी

---

**44.** 'दुरात्मा' हा शब्द कोणत्या संधीचा प्रकार आहे ?

(1) स्वरसंधी

(2) व्यंजनसंधी

(3) विसर्गसंधी

(4) पररूपसंधी

---

45. स्वरसंधीच्याबाबतीत पुढीलपैकी कोणते नियम अचूक आहेत ?

a. 'ए' या स्वरापुढे कोणताही स्वर आला तर त्याचा 'अय्' होऊन पुढील स्वर त्यात मिसळतो.

b. 'ऐ' या स्वरापुढे कोणताही स्वर आला तर त्याचा 'अवी' होऊन पुढील स्वर त्यात मिसळतो.

c. 'ओ' या स्वरापुढे कोणताही स्वर आला तर त्याचा 'अव्' होऊन पुढील स्वर त्यात मिसळतो.

(1) फक्त a व c बरोबर, b चूक

(2) फक्त b बरोबर, a व c चूक

(3) फक्त a व b बरोबर, c चूक

(4) फक्त c बरोबर, a व b चूक

46. खालीलपैकी विध्यर्थी वाक्य कोणती ?

a. तुला परीक्षेत यश मिळो.

b. आपण माझी रजा मंजूर करावी.

c. मी आंबा खातो.

d. हे काम तोच करू जाणे.

(1) फक्त a व d बरोबर, b व c चूक

(2) फक्त b व c बरोबर, a व d चूक

(3) फक्त a बरोबर, b, c व d चूक

(4) फक्त d बरोबर, a, b व c चूक

47. पुढील विधाने वाचून योग्य पर्याय निवडा.

a. वाक्याचे मुख्य तीन प्रकार आहेत.

b. केवल वाक्यास काही अभ्यासक शुद्ध वाक्य असेही म्हणतात.

c. केवल वाक्यात एकच उद्देश्य व एकच विधेय असते.

(1) a व c बरोबर, b चूक

(2) a व b बरोबर, c चूक

(3) a, b व c बरोबर

(4) a व b चूक, c बरोबर

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

48. जे गौणवाक्य प्रधान वाक्यातील क्रियापद, विशेषण किंवा क्रिया विशेषण यांच्याबद्दल विशेष माहिती सांगते त्याला कोणते वाक्य म्हणतात ?

(1) नामवाक्य
(2) विशेषण वाक्य
(3) क्रियाविशेषण वाक्य
(4) मिश्रवाक्य

49. एक प्रधानवाक्य व एक किंवा अधिक गौणवाक्ये गौणत्वसूचक उभयान्वयी अव्ययांनी जोडून जे एक वाक्य तयार होते त्यास काय म्हणतात ?

(1) केवलवाक्य
(2) मिश्रवाक्य
(3) संयुक्तवाक्य
(4) गौणवाक्य

50. पुढील विधाने वाचून योग्य पर्याय निवडा.

a. ज्या समासात दुसरे पद महत्वाचे व पहिले पद गौण असते त्याला अव्ययीभाव समास म्हणतात.

b. समासातील दोन्ही पदे महत्वाची असतात त्याला द्वंद्व समास म्हणतात.

c. समासातील दोन्ही पदे गौण असून त्यांच्या एकत्र येण्यातून तिसऱ्याच गोष्टीचा बोध होत नाही त्याला बहुव्रीही समास म्हणतात.

(1) फक्त a बरोबर, b व c चूक

(2) फक्त a आणि b बरोबर, c चूक

(3) फक्त b आणि c बरोबर, a चूक

(4) फक्त b बरोबर, a व c चूक

51. Change the sentence into indirect speech.

"Call the first witness", said the judge.

(1) The judge commanded them to call the first witness.

(2) The judge has ordered them for calling the first witness.

(3) The order has been given by judge to them for calling of the witness.

(4) Judge asked them, "call the witness".

52. Identify the correct meaning of the underlined part of the following sentence.

The President took the moral high ground.

(1) Stood on a podium
(2) Was morally incorrect
(3) Brought the morale down
(4) Was honest

---

53. Identify the kind of verb in the given sentence.

"He got her a splendid present".

(1) Transitive verb
(2) Intransitive verb
(3) Ditransitive verb
(4) Complex transitive verb

---

54. Identify the degree of comparison of the adjective in the given sentence.

Frank is the least tall of the boys.

(1) Positive
(2) Comparative
(3) Superlative
(4) Negative

---

55. Find the correct synonym for 'Muggy'.

(1) Nippy
(2) Humid
(3) Breezy
(4) Windy

---

56. Choose suitable adverbial phrase for the underlined words in the sentence. Generally speaking, my paper was considered superior to his.

(1) Over and above
(2) Now and then
(3) On the whole
(4) Once and again

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**57.** Identify the correct meaning of the word underlined in the context.

I was very firm about what I wanted.

(1) hard
(2) secured
(3) resolute
(4) solid

---

**58.** Choose the correct meaning of the words underlined in their respective contexts.

a. They need to weigh benefit against risk.
b. He has to weigh up the possibilities.

(1) Balance – consider
(2) Measure – analyse
(3) Burden – overload
(4) Consider – evaluate

---

**59.** Select the correct sentences from the following :

a. Open the door, will you ?
b. Let's see that movie, should'nt we ?
c. The country needs a more dynamic leader, doesn't she ?
d. The girl hasn't slept yet, hasn't she ?

(1) a and c only
(2) a and b only
(3) b and c only
(4) a and d only

---

**60.** Select the correct phrase for the underlined word.

Nobody likes his proud behaviour.

(1) hard pressed
(2) high living
(3) high handed
(4) high and mighty

---

61. __________ is not a modal auxiliary.

(1) Can (2) Ought to

(3) May (4) Do

62. Identify adjective clause in the following sentence :

The watch which has a golden chain is mine.

(1) golden chain (2) which has a golden chain

(3) golden chain is mine (4) chain is mine

63. Give antonyms of the following words : exult, imbecile.

a. delight, lamebrain

b. rejoice, birdbrain

c. exuberate, shrewd

d. lament, sane

(1) a and b only (2) c only

(3) a and d only (4) d only

64. Choose the grammatically incorrect sentences from the following :

a. I want that you should meet him.

b. We discussed the matter yesterday.

c. She requested for my help.

(1) Only a (2) Only a and b

(3) Only a and c (4) Only b and c

65. Choose the correct option to change the following 'simple sentence' into 'complex sentence'.

Riding a bike she fell down on a road.

(1) She was riding a bike and then she fell down on the road.

(2) While she was riding a bike she fell down on the road.

(3) She was riding a bike and she fell down on the road.

(4) She was felling down while she was riding a bike.

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

66. Match the pairs.

| I | | II | |
|---|---|---|---|
| a. | Taciturn | i. | acts on a sudden idea without thinking first |
| b. | Effusive | ii. | reserved or speaks very little |
| c. | Impetuous | iii. | lacks confidence |
| d. | Diffident | iv. | gives exaggerated expression of pleasure, praise or gratitude |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | ii | iv | i | iii |
| (2) | iii | iv | i | ii |
| (3) | iii | iv | ii | i |
| (4) | iv | i | iii | ii |

67. Which of the following is an appropriate question tag for the following sentence ?

We must go now.

(1) must we ?

(2) shall we ?

(3) shan't we ?

(4) mustn't we ?

68. Match the following pairs.

| A | | B | |
|---|---|---|---|
| i. | Upend | a. | Finish |
| ii. | End up | b. | Move into a vertical position |
| iii. | Do out | c. | Do better than |
| iv. | Out do | d. | Decorate |

(1) i – c ii – d iii – b iv – a

(2) i – d ii – a iii – c iv – b

(3) i – b ii – a iii – d iv – c

(4) i – a ii – b iii – d iv – c

**69.** Choose the correct indirect speech of the following sentence.

He said, "we were having lunch".

(1) He said they had been having lunch
(2) He said they are having lunch
(3) He said they were having lunch
(4) He said they will be having lunch

---

**70.** Choose the option having opposite meaning of the underlined word in the following sentence.

The old man led a solitary life.

(1) Happy
(2) Private
(3) Long
(4) Sociable

---

**71.** Identify the moods expressed in the following sentences.

a. If my friend wants it, I shall give it to him.
b. Let us go.
c. I move that Mr. Gupta be appointed Chairman.

| | a | b | c |
|---|---|---|---|
| (1) | Subjunctive | Indicative | Imperative |
| (2) | Imperative | Indicative | Subjunctive |
| (3) | Indicative | Imperative | Subjunctive |
| (4) | Subjunctive | Imperative | Indicative |

---

**72.** Match the prefixes on left with their meanings on right :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | Arch | i. | Against |
| b. | Contra | ii. | Before |
| c. | Ante | iii. | Secret |
| d. | Crypto | iv. | Main |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | iii | ii | iv | i |
| (2) | ii | iii | i | iv |
| (3) | iv | i | ii | iii |
| (4) | i | iv | ii | iii |

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

73. Identify the correct word order to make a meaningful sentence.

| | | |
|---|---|---|
| Communication facilities | – | A |
| Information technology | – | B |
| All over the world | – | C |
| Has been built upon | – | D |
| A strong infrastructure | – | E |
| Of | – | F |

(1) A – F – B – C – D – E

(2) C – B – D – E – F – A

(3) B – F – A – D – E – C

(4) E – F – B – D – A – C

74. Identify the wrongly spelt word/s from the following :

a. Haphazard

b. Hereditry

c. Hypocrisy

d. Heterogineous

(1) a and c only

(2) b and d only

(3) Only c

(4) Only d

75. Identify the correct indirect speech of the following sentence.

He said, "I have been waiting here for a long time".

(1) He said I have been waiting here since a long time.

(2) He said he have been waiting here for a long time.

(3) He said that he have been waiting here for a long time.

(4) He said that he had been waiting there for a long time.

Read the following passage carefully and answer Q. No. **76** to **80** based on it.

The majority of successful senior managers do not closely follow the classical rational model of first clarifying goals, assessing the problem, formulating options, estimating likelihoods of success, making a decision, and only then taking action to implement the decision. Rather, in their day-by- day tactical manoeuvres, these senior executives rely on what is vaguely termed "intuition" to manage a network of interrelated problems that require them to deal with ambiguity, inconsistency, novelty, and surprise; and to integrate action into the process to thinking.

Generations of writers on management have recognized that some practising managers rely heavily on intuition. In general, however, such writers display a poor grasp of what intuition is. Some see it as the opposite of rationality; others view it as an excuse for capriciousness.

Isenberg's recent research on the cognitive processes of senior managers reveals that managers' intuition is neither of these. Rather, senior managers use intuition in at least five distinct ways. First, they intuitively sense when a problem exists. Second, managers rely on intuition to perform well-learned behaviour patterns rapidly. This intuition is not arbitrary or irrational, but is based on years of painstaking practice and hands-on experience that build skills. A third function of intuition is to synthesize isolated bits of data and practise into an integrated picture, often in an "Aha!" experience. Fourth, some managers use intuition as a check on the results of more rational analysis. Most senior executives are familiar with the formal decision analysis models and tools, and those who use such systematic methods for reaching decisions are occasionally leery of solutions suggested by these methods which run counter to their sense of the correct course of action. Finally, managers can use intuition to bypass in-depth analysis and move rapidly to engender a plausible solution. Used in this way, intuition is an almost instantaneous cognitive process in which a manager recognizes familiar patterns.

---

**76.** Which of the following are described as part of the classical rational model ?

a. Assessing the problem.

b. Decision making.

c. Using intuition.

(1) c only (2) a and c only

(3) a and b only (4) a, b and c

---

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

77. What can be managed through intuition ?

a. Novelty

b. Surprise

c. Ambiguity.

(1) b only (2) c only

(3) a and c only (4) a, b and c

78. Some writers view intuition as the ________ of _______.

(1) Positive, rationality (2) Opposite, rationality

(3) Parallel, capriciousness (4) Similar, capriciousness

79. Which of the following is/are not use/s of intuition ?

a. Recognition of a problem.

b. Predicting success.

c. Arriving at a holistic view.

(1) b only (2) a and b only

(3) b and c only (4) a and c only

80. Match the following.

a. Isenberg I. Bypass in-depth analysis

b. Intuition II. Cognitive processes

c. Systematic methods III. Decisions

| | a | b | c |
|---|---|---|---|
| (1) | III | I | II |
| (2) | I | II | III |
| (3) | I | III | II |
| (4) | II | I | III |

81. Identify the correct meanings of the underlined in their contexts :

I. The horse had injured one of rear legs.

II. He describes how these birds rear their young.

III. The lion slowly reared its head and looked around.

IV. Two police motor cyclists brought up the rear of the demonstration.

a. care for

b. last part

c. back

d. rise up

| | I | II | III | IV |
|---|---|---|---|---|
| (1) | b | c | a | d |
| (2) | c | d | a | b |
| (3) | a | c | d | b |
| (4) | c | a | d | b |

82. Identify type of concord in the following sentence :

Bread and butter is the main concern of the common man.

a. grammatical concord.

b. notional concord.

c. principle of proximity.

d. verb concord.

(1) d only

(2) a and b only

(3) b only

(4) a and c only

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

83. Match the following with opposite meaning :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | Acute | I. | Acrimony |
| b. | Goodwill | II. | Mild |
| c. | Modern | III. | Continue |
| d. | Cease | IV. | Antiquity |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | III | I | IV | II |
| (2) | II | I | IV | III |
| (3) | III | IV | I | II |
| (4) | I | IV | II | III |

84. Select the correct words for the underlined phrases.

a. Frozen raindrops have ruined the crop.

b. Artisans organised themselves in welfare society for mutual help in Europe in the past.

(1) Gild, hale

(2) Hail, guild

(3) Storm, glide

(4) Thunder, guild

85. Which of the following sentences is correct with punctuation mark of semicolon ?

(1) Sarah wanted to be a doctor ; however she faints at the sight of blood.

(2) Sarah wanted to be a doctor however she faints ; at the sight of blood.

(3) Sarah wanted to be a doctor however ; she faints at the sight of blood.

(4) Sarah wanted to be a doctor ; however, she faints at the sight of blood.

86. Identify the active form of the following sentence.

A large sum of money was recently donated to the hospital.

(1) Someone was donating a large sum of money to the hospital recently.

(2) Someone recently donated a large sum of money to the hospital.

(3) Someone has donated a large sum of money to the hospital recently.

(4) Someone is recently donating a large sum of money to the hospital.

87. Identify the sentence/(s) with the correct use of correlatives.

a. He not only cheated his friends but also his parents.

b. You may either have an apple or an orange.

c. The elephant both swallowed the bag and the buns.

d. She neither cares for gold nor silver.

(1) Only a

(2) Only b

(3) Only a and c

(4) Only b and c

88. She is a very economical lady. The meaning of the underlined word is

(1) extravagant

(2) reckless

(3) thrifty

(4) financial

89. Choose the correct tag question form for the given sentence.

We seldom see them nowadays.

(1) We seldom see them nowadays, don't we ?

(2) We seldom see them nowadays, isn't it ?

(3) We seldom see them nowadays, do we ?

(4) We seldom see them nowadays, seldom we ?

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**90.** Identify the type of clause underlined in the following sentence.

The boy <u>who comes to me daily</u> is my fast friend.

(1) Adverb clause

(2) Noun clause

(3) Adjective clause

(4) Prepositional clause

---

**91.** Identify the adverb clause of time from the following sentences.

A. We got the seeds planted before the rains come.

B. She is as wise as she is beautiful.

C. You may do as you please.

(1) A only

(2) A and B only

(3) C only

(4) A and C only

---

**92.** What is the meaning of the word "benevolent" ?

(1) Malevolent

(2) Kind

(3) Cruel

(4) Indifferent

---

**93.** Identify the correct sentences.

a. We work hard and wait for the result.

b. Flattery has its effect on a vain mind.

c. He neglected his work and the consequence was he lost his position.

(1) Only a and b are correct

(2) Only b and c are correct

(3) Only a and c are correct

(4) All are correct

---

**94.** Change the following sentence into indirect speech.

He said, " I am glad to be here this evening".

(1) He said that he had been glad to be there that evening

(2) He said that he has been glad to be here this evening

(3) He said that he was glad to be here this evening

(4) He said that he was glad to be there that evening

---

**95.** Choose appropriate antonym of the word, 'Petulance'.

(1) grumpiness

(2) waspishness

(3) amiability

(4) peevishness

---

**96.** Choose the correct option from those given below, which means the Idiom underlined in the sentence.

Whenever we go for an outing, my wife wants to buy everything but the kitchen sink !

(1) almost everything one can think of

(2) everything that is useless

(3) everything that is useful for kitchen only

(4) everything that is decorated

---

**97.** ___________ gold is a precious metal.

The article which fills the blank correctly in the above sentence to express general sense.

(1) An (2) A

(3) No article (4) The

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

98. Choose the correct sentences.

a. Herself saw the burglar.

b. None of these boys is here.

c. Pope than whom few men had more vanity.

(1) b only
(2) c only
(3) a and c only
(4) a, b and c

---

99. Match the following.

I. Ligature — a. A situation in which no progress is made

II. Impasse — b. Something that is used to bind

III. Quintessential — c. A funny or clever remark

IV. Quip — d. Perfect as an example of a type of person/thing

| | I | II | III | IV |
|---|---|---|---|---|
| (1) | a | b | c | d |
| (2) | b | c | a | d |
| (3) | b | a | d | c |
| (4) | d | a | c | b |

---

100. Choose the appropriate sentence which showcases an indicative mood.

(1) Rama goes to school everyday

(2) Wait there

(3) Let us go

(4) If he were here, he would support me

---

**सूचना – (पृष्ठ 1 वरून पुढे.....)**

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या ''परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82'' यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपुस्तिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षा कक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

प्र. क्र. **201.** "अंगावर काटा उभा रहाणे" या व्याक्यप्रचाराचा अर्थ काय ?

(1) अंग शहारणे (2) रोमांचित होणे

(3) अतिशय भिती वाटणे (4) बहरून येणे

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर ''(3) अतिशय भिती वाटणे'' असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर ''(3)'' होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. **201** समोरील उत्तर-क्रमांक ''③'' हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. **201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तर-क्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्न-क्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**